# स्वातंत्र्यवीर सावरकर
## (दि.२८ मे, १८८३-२६ फेब्रुवारी, १९६६)
## (अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे थोर देशभक्त, साहित्यिक आणि समाजसुधारक. विनायक दामोदर सावरकर हे “स्वातंत्र्यवीर” म्हणून विख्यात आहेत. जन्म नाशिक जवळील भगूर ह्या गावी. सावरकरांचे शिक्षण भगूर, नाशिक, पुणे आणि मुंबई येथे एल.एल.बी.पर्यंत झाले. पुढे “बॅरिस्टर” ही पदवी त्यांनी लंडनला जाऊन घेतली.

सन १८९७ साली पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथीत इंग्रज सैनिकांनी नागरिकांवर अतोनात अत्याचार केले, त्याचा सूड घेण्यासाठी चाफेकर बंधूंनी पुण्याचे कमिशनर रँड ह्याचा खून केला. चाफेकर बंधूंना फाशी देण्यात आली. त्यांच्या बलिदानाचा सावरकरांच्या मनावर खोल ठसा उमटला आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र युद्ध करण्याची शपथ घेतली. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने त्यांनी “मित्रमेळा” अर्थात “अभिनव भारत” ची (१९०४) स्थापना केली.

एल.एल..बी. झाल्यानंतर लंडनमध्ये बॅरिस्टरीचे शिक्षण घेण्यासाठी दि.९ जून, १९०६ या दिवशी सावरकरांनी भारताचा किनारा सोडला. लंडनमध्ये असताना “ *जोसेफ मॅझिनी यांचे आत्मचरित्र”* लिहीले व *“राजकारण”*(१९०७) हा ग्रंथ अनुवादित केला. “ *१८५७ चे स्वातंत्र्यसमर*“ या ग्रंथाचे हस्तलिखितही पूर्ण केले ( १९०८). लंडनला सावरकरांच्याबरोबर असलेले *सेनापती बापट* यांनी काही रशियन क्रांतिकारकांच्या साहाय्याने बॉंब तयार करण्याची विद्या आत्मसात केली. ही माहिती भारतात क्रांतिकारकांच्या विविध केंद्रांवर पाठविण्यात आली. सावरकरांनी काही पिस्तुले मिळवून तीही भारतात पाठविली होती.

नाशिकचा ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन यांच्या खूनामध्ये साहाय्य केल्याचा आरोप ठेवून इंग्रजांनी सावरकरांना दि.१३ मार्च, १९१० रोजी अटक केली. पुढे चौकशीसाठी त्यांना भारतात नेले जात असताना “पोर्ट होल” मधून समुद्रात उडी घेतली आणि ते मार्सेच्या धक्क्यावर फ्रेंच हद्दीत आले. फ्रान्सच्या भूमीवर केलेली अटक कायदेशीर नसल्याची हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात मागितलेली दादही व्यर्थ ठरली.

सावरकरांना हिंदुस्थानात आणून त्यांच्यावर दोन खटले चालविण्यात आले. जॅक्सनच्या वधाला साहाय्य केल्याचा तसेच अन्य काही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले होते. या दोन्ही खटल्यांचा निकाल लागून सावरकरांना पन्नास वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा झाली. (दि.२४ डिसेंबर, १९१० आणि दि.३० जानेवारी, १९११).

सावरकर हिंदीचे अभिमानी होते. हिंदी भाषेच्या प्रचाराचेही त्यांनी अंदमानात काम केले. हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे, या मताचे ते होते. मात्र, इतर प्रांतांच्या भाषाही शिकल्या पाहिजेत, असे ते सहबंदिवानांना सांगत असत.

सन १९२१ मध्ये सावरकरांना अंदमानामधून हिंदुस्थानात आणण्यात आले आणि रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तिथे त्यांनी "*हिंदुत्व*"(मूळ ग्रंथ इंग्रजी मराठी अनुवाद, १९२५) आणि "*माझी जन्मठेप*" (१९२७) हे ग्रंथ लिहिले. सावरकर हे वृत्तीने कवी होते. "सागरा प्राण तळमळला" ही कविता त्यांना एका तीव्र भावावेगाच्या प्रसंगी सूचली. "सावरकरांची कविता" (१९४३) या नावाने त्यांच्या कविता संकलित करण्यात आल्या आहेत. "रानफुले" (१९३४), "माझ्या आठवणी" (१९४९), "भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने" (१९६३), "शत्रुंच्या शिबिरात" (१९६५) हे त्यांचे अन्य काही उल्लेखनीय ग्रंथ होत. तसेच "शत्रुंच्या शिबिरात" हे आत्मचरित्रात्मक पुस्तक, "मोपल्यांचे बंड अर्थात मला काय त्याचे? " "काळे पाणी" या त्यांच्या दोन कांदबऱ्या व "उःशाप" (१९२७) "संन्यस्त खड्ग" (१९३१) आणि "उत्तरक्रिया" (१९३३) ही त्यांनी लिहिलेली नाटके होत.

अस्पृश्य व उच्चवर्णीय यांच्यात सामाजिक अभिसरण घडून यावे, यावर त्यांच्या अस्पृश्यत: निवारण चळवळीचा विशेष भर होता. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश बंदी असल्यामुळे त्यांनी सर्वांसाठी प्रवेश असलेले "पतित पावन मंदिर" बांधविले. रत्नागिरीतील विठ्ठल मंदिरात होणाऱ्या गणेशोत्सवात अस्पृश्यांना प्रवेश देणार नाही, अशी भूमिका सनातन्यांनी घेताच सावरकरांनी अखिल हिंदू गणपती स्थापन करून त्याचा उत्सव केला आणि गणेशमूर्तीची पूजा एका सफाई कामगाराच्या हस्ते केली. धर्मांतरितांना पुन्हा हिंदू धर्मात सन्मानपूर्वक प्रवेश देऊन त्यांनी त्यांची लग्ने हिंदू समाजात लावून देण्यासाठी पुढाकार घेतला.

सन १९४३ मध्ये सांगली येथे भरलेल्या नाट्यशताब्दी महोत्सवाचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी त्यांना नागपूर विद्यापीठाकडून डी.लिट्. ही सन्माननीय पदवी देण्यात आली.

सन १९६६ मध्ये मुंबई येथे त्यांची प्रकृती ढासाळली आणि त्यांनी प्रायोपवेशन करुन जीवनाचा अंत करण्याचे ठरविले व त्यातच त्यांचे देहावसान झाले.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)